I O करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): अहमदनगर P.S.(ठाणे): अकोले Year (वर्ष): 2021
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0159 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/05/2021 21:54 वजे

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): मंगलवार
Time Period (कालावधी): पहर 4
Date From (दिनांक पासून): 18/05/2021
Date To ( दिनांक पर्यंत): 18/05/2021
Time From (वेळेपासून): 12:30 वजे
Time To (वेळेपर्यंत): 12:35 वजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 18/05/2021 Time (वेळ): 21:35 वजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ
Entry No. (नोंद क्र.): 021 Date & Time (दिनांक आणि वेळ): 18/05/2021 21:35 वजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 1 किमी Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): कामकाजाच्या खोलीमधील टेबलच्या , अकोले पोलिस स्टेशन ,ता अकोले

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): वाल्मीक पंढरीनाथ चौधरी
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1985 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा.वेल्हाळे, पोस्ट राजापूर,ता संगमनेर, , संगमनेर तालुका,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा.वेल्हाळे, पोस्ट राजापूर,ता संगमनेर, , संगमनेर तालुका,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9850696463

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप भाऊसाहेब पांडे | | | 1. नेमणूक अकोले पोलीस स्टेशन,ता अकोले ,अकोले,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय रुपया | 500/- दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 5,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादअकोले, जि.अहमदनगरदि. 18/05/2021मी वाल्मीक पंढरीनाथ चौधरी, वय 36 वर्षे, धंदा व्यवसाय, रा.वेल्हाळे, पोस्ट राजापूर, ता. संगमनेर, जि.अहमदनगर मो.नं. 9850696463. समक्ष हजर राहुन विचारले वरून सांगतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास असुन, माझे घुलेवाडी, ता.संगमनेर व मौजे सुगाव, ता.अकोले येथे फर्निचरचे दुकान आहे. माझे साडु श्री.पंढरीनाथ कारभारी रंधे, त्यांचे मुले योगेष व सुनिल, सर्व रा.पिंपळदरी, ता.अकोले, जि.अहमदनगर यांच्याविरुध्द अकोले पोलीस स्टेषन येथे त्यांच्या भाऊबंदांनी रस्त्याच्या वादातुन एन.सी. दाखल केली आहे. त्याचा तपास अकोले पोलीस स्टेशनकडील पोलीस श्री.संदीप पांडे यांच्याकडे आहे. दि.13/5/2021 रोजी पांडे पोलीस यांनी माझे साडु व त्यांच्या मुलांना सदर प्रकरणात अकोले पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. त्यावेळी माझे साडुने मला अकोले पोलीस स्टेषन येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी अकोले पोलीस स्टेशन येथे गेलो असता तेथे पांडे पोलीस यांची भेट घेतली व त्यांना म्हणालो, माझे साडु व त्यांच्या मुलांचा काही संबंध नाही. त्यांचा मुलगा सुनिल रंधे हा आर्मी मध्ये भरती होणार आहे. या केस मध्ये तो अडकला तर त्याचे नुकसान होईल. त्यावेळी पांडे पोलीस म्हणाले की, मी तिघांविरुध्द चाप्टर केस करणार आहे, त्यांना दि.18/5/2021 रोजी मा. कोर्टासमोर हजर करणार आहे. तुम्हाला जर त्याच दिवशी जामीन करावयाचा असेल व सुनिल रंधे यांचे नाव कमी करायचे असेल तर तुम्ही मला चाळीस हजार रुपये दया. त्यावेळी माझे लक्षात आले की, पांडे पोलीस हे जामीन करणेकामी व केस मधुन सुनिल रंधे नाव कमी करण्यासाठी माझेकडे लाच मागत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसतांना, परंतु ते विनाकारण माझे साडु व त्यांच्या मुलांना अटक करतील, जामीन होवु देणार नाही म्हणुन मी पांडे पोलीस यांना काही तरी पैसे कमी करण्याची विनंती केली. त्यावेळी पांडे पोलीस यांनी तडजोडीअंती वीस हजार रुपये दया असे म्हणाले. त्यावेळेस मी माझेकडे उपलब्ध असलेले पंधरा हजार रुपये त्यांना देवुन उर्वरित पाच हजार रुपये दि.18/5/2021 रोजी जामीनच्या दिवशी देतो असे म्हणालो. त्यावेळी पांडे पोलीस यांनी मला बजावले की, दि.18/5/2021 रोजी माझे साडु, त्यांची मुले व जामीनदार यांना पोलीस स्टेशन येथे हजर करा तसेच माझे राहीलेले 5000/- रुपये घेवुन या, ते पैसे दिल्याशिवाय मी त्यांना कोर्टासमोर हजर करणार नाही. त्यावेळी आम्ही तेथुन निघुन आलो. त्यानंतर मी लाप्रवि अहमदनगर कार्यालयात येवुन पोउपअधि श्री. रोडकर साहेब यांना भेटुन माझी एक लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार सांगितली. त्याप्रमाणे त्यांनी मला ते सापळा पथकासह दि. 18/05/2021 रोजी कारवाई करीता अकोले येथे येतो, तुम्ही लाचेच्या रक्कमेसह संगमनेर अकोले रोडवरील सुरक्षित ठिकाणी गाडीसह हजर रहा, अशी सुचना दिली. त्याप्रमाणे दि. 18/05/2021 रोजी मी सुचनेप्रमाणे संगमनेर अकोले रोडवर सुरक्षीत ठिकाणी हजर असताना पोउपअधी श्री.रोडकर हे तेथे शासकीय वाहनाने सोबतचे स्टाफसह आले. पोउपअधी.रोडकर यांनी माझी ओळख करुन घेवुन, त्यांनी, पो.नि. श्री. [illegible], सापळा पथकातील



Scanned with CamScanner

कर्मचारी व सोबतचे पंच यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअधी.श्री.खेडकर यांनी कारवाईचे पुढील कामकाज पो.नि. करांडे यांना करण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि श्री. करांडे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी शासकिय वाहनामध्ये बसलो. त्यावेळी दोन्ही पंचानी मला नांव, पत्ता विचारुन, माझी तक्रार विचारली असता मी वरील प्रमाणे नांव पत्ता सांगुन, माझी लाच मागणीची तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर पो.नि श्री. करांडे यांनी दिले सुचेने प्रमाणे मी माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून दिली. त्यावर मी सही केली. त्यानंतर पो.नि श्री. करांडे व दोन्ही पंचानी मी लिहून दिलेल्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर मी पांडे पोलीस यांचे विरुध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि श्री. करांडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हाताळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.नि श्री. करांडे यांनी व्हाईस रेकर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पो.नि श्री. करांडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पो.नि श्री. करांडे यांनी मला व पंच नं.1 अशांना माझेकडे व्हाईस रेकर्डर चालु करून देवुन पांडे पोलीस यांची भेट घेण्यासाठी माझे कडील इनोव्हा क्रिस्टा चारचाकी गाडीतुन रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह रवाना होवुन अकोले पोलीस स्टेशन येथे जावून पांडे पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी पांडे पोलीस यांनी माझेकडे पंच नं. 1 यांचे समक्ष माझे साडु व त्यांच्या मुलाच्या विरुध्द दाखल केस मध्ये जामीन करण्यासाठी व साडुचा मुलगा सुनिल रधे याचे नाव कमी करण्यासाठी म्हणुन माझेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे माझे चारचाकी गाडीवरून पो.नि श्री. करांडे हे थांबले त्या ठिकाणी परत निघुन आलो.त्यानतर तेथे पो.नि श्री. करांडे यांनी माझेकडे व पंच नं.1 यांचेकडे त्याना केले पारुन घडले हकीकती बददल विचारता मी वरील प्रमाणे सविस्तर हकीकत सांगितली. त्यानतर पो.नि श्री. करांडे यांनी दोन्ही पंचसमक्ष व्हाईस रेकर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ते मी व पंच नं.1 यानी सांगितले हकीकती प्रमाणे असल्याची खात्री करून त्याचा उतारा तयार केला. पांडे पोलीस यांनी माझे साडु व त्यांच्या मुलांच्या विरुध्द दाखल केस मध्ये जामीन करण्यासाठी व साडुचा मुलगा सुनिल रधे याचे नाव कमी करण्यासाठी म्हणुन माझेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याने, त्यांचे विरुध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर पो. नि श्री. करांडे यांनी मला पांडे पोलीस यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 5,000/- रुपये त्यात 500/- रु दराच्या 10 चलनी नोटा असे समक्ष हजर केले. त्यानंतर अॅन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पो.क. पाढरे यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे पन्टचे समोरील बाजुचे उजवे खिश्यात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेषीर कारवाई करण्यात आली. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा लपटपवर शासकिय वाहनामध्ये टंकलिखीत करण्यात आला. त्यानंतर व्हाईस रेकर्डरसह मला व पंच नं.1 यांना पांडे पोलीस यांची भेट घेण्यासाठी अकोले पोलीस स्टेषन येथे माझे इनोव्हा चारचाकी गाडीतुन रवाना केले. पाठोपाठ पो.नि श्री. करांडे हे सापळा पथकासह येवून पांडे पोलीस यांचे विरुध्द अकोले पोलीस स्टेषनचे प्रवेषव्दाराचे बाहेरील बाजूस सापळा लावला. त्यावेळी पांडे पोलीस तेथे आले त्यांनी होमगार्ड कार्यालयाचे बाजूस असलेल्या खोलीचे कुलूप उघडुन मला आत घेवुन गेले व लाचेची रक्कम त्यांच्या टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांचे समक्ष 5000/- रुपये त्या टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवले. त्यानंतर आम्ही तहसिल कार्यालयात चप्टर केस करणेकामी गेलो. त्यावेळेस मी 12.30 वा. चे सुमारास लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इषारा केला. नंतर पो.नि करांडे यांनी लोकसेवक पांडे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर होमगार्ड कार्यालयाच्या षेजारील पांडे पोलीस यांच्या कामकाजाच्या पोलीस खोलीतील टेबलच्या ड्राव्हर मधुन लाचेची रक्कम पंच नं.2 करवी हस्तगत करण्यात आली. त्यानंतर सदर खोलीत पांडे पोलीस यांची, माझी, पंच, सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी यांच्या आवष्यक त्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर अकोले येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृह येथे येवून, तेथील कक्ष उपलब्ध करून घेवून, पंचनाम्याचे पुढील कामकाज केले. तरी यातील लोकसेवक संदिप भाऊसाहेब पांडे, वय 33 वर्श, पोलीस नाईक, बक्कल नंबर 1681, नेमणुक अकोले पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर मुळ रा. इंदिरा नगर, गल्ली नं.9, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांनी, माझे साडु व त्यांच्या मुलाच्या विरुध्द दाखल केस मध्ये जामीन करण्यासाठी व साडुचा मुलगा सुनिल रधे याचे नाव कमी करण्यासाठी म्हणुन माझेकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करत असल्याने मी दिले तक्रारीवरुन मी आज दि. 18/5/2021 रोजी पंच न. 1 यांचेसह पांडे पोलीस यांची अकोले पोलीस स्टेषन येथे भेट घेतली असता, लोकसेवक श्री.पांडे पोलीस यांनी माझेकडे 5000/- रु. लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान 12.30 वा. चे सुमारास पंच नं. 1 यांचे समक्ष त्याच्या कामकाजाच्या खोलीमधील टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवण्यास सांगुन ती स्वीकारुन स्वतःचा आर्थीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले. म्हणुन माझी लोकसेवक संदिप भाऊसाहेब पांडे, वय 33 वर्श, पोलीस नाईक, बक्कल नंबर 1681, नेमणुक अकोले पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर मुळ रा.इंदिरा नगर, गल्ली नं.9, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): barku balu gondhe
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): 1764 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
अकोले पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): ABHAY MUKUNDRAO PARMAR

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):



Scanned with CamScanner